# दि हायकोर्ट एम्प्लॉईज को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड, मुंबई

## नोटीस

प्रति,
सभासद,
**दि हायकोर्ट एम्प्लॉईज को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड, मुंबई**

वरील सोसायटीची ९४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार दिनांक २८ ऑगस्ट २०२४ रोजी सायंकाळी ठिक ५.१० वाजता उच्च न्यायालयाच्या ॲनेक्स इमारतीमधील, दुसऱ्या मजल्यावर, १६-अे, क्रमांकाच्या खोलीमध्ये होणार आहे. त्यावेळी खालील कामे करण्यात येतील.

१. गतवर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
२. वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजर असणाऱ्या सभासदांची रजा क्षमापित करणे.
३. आर्थिक वर्ष २०२२-२३ च्या वैधानिक लेखापरिक्षणाच्या दोष दुरुस्ती अहवालास मंजूरी देणे.
४. दि. ३१/०३/२०२४ अखेर संपणाऱ्या वर्षाचा सोसायटीचा वार्षिक अहवाल, नफा-तोटा, ताळेबंद पत्रके वाचून मंजूर करणे.
५. सन २०२३-२०२४ च्या वर्षाचा वैधानिक लेखापरिक्षण अहवाल आणि सन २०२३-२४ या वर्षाचा अंतर्गत लेखा परिक्षकांचा अहवाल वाचुन स्विकृत करणे.
६. सन २०२३-२०२४ या सालामध्ये झालेल्या नफ्याची वाटणी मंजूर करणे.
७. सन २०२४-२०२५ या वर्षाकरिता अंतर्गत आणि वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
८. सन २०२४-२०२५ चे अंदाजपत्रक मंजूर करणे.
९. मा. विभागीय सहनिबंधक, मुंबई यांचेकडून सन २०२३-२४ च्या नफ्याच्या १०% प्रमाणे रक्कम राखीव निधीला वर्ग करण्यासाठी परवानगी घेणेबाबत
१०. सोसायटीच्या पोटनियमांमध्ये सुचविलेल्या दुरूस्त्या मंजूर करणे.
११. अध्यक्षांच्या परवानगीने इतर कामे पुढे आल्यास त्यांचा विचार करणे.

R. R. Kadam

ता. १२ ऑगस्ट २०२४ **श्री. रा. र. कदम :** मा. कार्यवाह

**वि. सूचना:**

१. गणसंख्येपूर्ती अभावी तहकूब झालेली सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व तिला गणसंख्येचे बंधन राहणार नाही.
२. दि. ०२/०९/२०२३ रोजी झालेल्या वार्षिक सभेचे इतिवृत, आर्थिक वर्ष २०२२-२३चा वैधानिक लेखापरिक्षणाचा दोष दुरुस्ती अहवाल, सन २०२३-२४ सालचा वैधानिक लेखापरिक्षणाचा अहवाल, सन २०२३-२४ सालचा अंतर्गत लेखापरिक्षण अहवाल त्याचप्रमाणे हिशेब तपासनिसांनी तपासलेले संस्थेचे हिशेब सभासदांच्या निरीक्षणासाठी संस्थेच्या कार्यालयात दि. २०/०८/२०२४ ते दि. २३/०८/२०२४ पर्यंत कार्यालयीन कामकाजाचे वेळेत उपलब्ध आहेत.
३. वार्षिक सभेमध्ये ज्या सभासदास प्रश्न विचारायचे असतील किंवा माहिती हवी असेल तर तत्संबंधी दि. २७ ऑगस्ट २०२४ या आत कार्यालयात लेखी कळविण्याबद्दल विनंती आहे. अकस्मात विचारलेल्या प्रश्नांचा विचार केला जाणार नाही.
४. सभासदांचे लक्ष वेधण्यात येते की, नफा वाटणीची रक्कम मंजुर झालेल्या तारखेनुसार ३ वर्षांच्या आत न नेल्यास ती रक्कम राखीव निधिमध्ये जमा करावी लागते.
५. सभासदांना विनंती आहे की त्यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहताना संस्थेच्या अहवालाची प्रत सोबत आणावी. ज्या सभासदांना अहवाल प्राप्त झाले नसतील त्यांनी ते संस्थेच्या कार्यालयात येऊन घेऊन जावेत किंवा संस्थेच्या वेबसाईट वरुन त्याची सॉफ्ट कॉपी प्राप्त करावी.

Scanned with OKEN Scanner